47

(31)

63

47 Annex C

सामाजिक न्याय, महिला व बालविकास आणि
आदिवासी विकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांतर्गत
चालविण्यात येत असलेल्या अनुदानित संस्थांमधील
प्रवेशितांना देण्यात येणारे दरडोई परिरक्षण (परिपोषण)
अनुदानात वाढ करण्याबाबत

## महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : विभशा-२०१०/प्र.क्र.७/विमाभश-२
मंत्रालय, मुंबई - ३२.
दिनांक : २९ डिसेंबर, २०११

वाचा :
१) शासन निर्णय समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. व्हीजेडब्ल्यू-१०९०/प्र.क्र.२२/प्रस्ताव-१/मावक-६, दि.२४ सप्टेंबर, १९९१
२) शासन निर्णय समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. व्हीजेडब्ल्यू-१०२०/प्र.क्र.२२/प्रस्ताव-२/मावक-६,दि.९ ऑक्टोबर, १९९१
३) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. व्हीएएस-१०९४/प्र.क्र.१७६/मावक-६, दि.२५ जुलै, १९९६
४) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र. विभशा-२००१/प्र.क्र.५१/मावक-६, दि.२० नोव्हेंबर, २००२
५) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. विभशा-२००६/प्र.क्र.११५/मावक-६, दि.१.२.२००७
६) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. विभशा-२००६/प्र.क्र.११५/मावक-६, दि.२७.५.२००८
७) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र.संकीर्ण -२००५ / प्र.क्र.२३४/का-३, दि.२२.१२.२००६

**प्रस्तावना :-**

स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या सामाजिक न्याय विभागाच्या नियंत्रणाखालील निवासी आश्रमशाळा, मुला-मुलींचे अनुदानित वसतीगृहे, अपंगांच्या विशेष शाळा /कार्यशाळा इत्यादी संस्थांमधील निवासी विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानात रू.६००/- वरून रू.६३०/- इतकी वाढ करण्यासंदर्भात उपरोक्त वाचा मधील शासन निर्णय क्र.६ नुसार निर्णय घेण्यात आला होता.सदर शासन निर्णयामध्ये परिरक्षण (परिपोषण) अनुदानाचे दर प्रत्येक वर्षी ग्राहक मुल्य निर्देशांकाशी निगडीत करण्यात यावा असाही निर्णय घेण्यात आला होता. तसेच महिला व बाल विकास विभागांतर्गत एडसग्रस्त व मतीमंद मुलांकरिता निवासी विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानात रू.६५०/- वरून रू.८२५/- इतकी वाढ करण्यासंदर्भात उपरोक्त वाचा मधील शासन निर्णय क्र.७ नुसार निर्णय घेण्यात आला होता.

GR 2011/02

गेल्या वर्षापासून महागाई पर्यायाने ग्राहक मूल्य निर्देशांकामध्ये (इंडेक्स) मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्यामुळे निवासी विद्यार्थ्यांना परिपोषण आहाराचे दर वाढवून देण्यासंबंधात सेवाभावी संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर मागणी होत होती. या मागणीचा सांगोपांग विचार करून आणि संस्थांना देण्यात यावयाच्या अनुदानात एकसूत्रता राहावी यासाठी शासनाने सामाजिक न्याय, महिला व बाल विकास आणि आदिवासी विकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानित संस्थांमधील प्रवेशितांना देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानात वाढ करण्याबाबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली होती.

मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील अभ्यासगटाने परिपोषण आहार अनुदानात वाढ करण्याबाबत केलेल्या शिफारशीनुसार प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.त्या अनुषंगाने मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार सामाजिक न्याय,आदिवासी विकास आणि महिला व बालविकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानित संस्थांमधील प्रवेशितांना देण्यात येणारे दरडोई परिरक्षण (परिपोषण) अनुदानात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णयः-**

सामाजिक न्याय,आदिवासी विकास आणि महिला व बालविकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या शासन मान्यताप्राप्त अनुदानित संस्थांमधील निवासी विद्यार्थ्यांसाठी रु. ६३०/- वरून दरमहा दरडोई रू.९००/- असा परिरक्षण (परिपोषण) दर दि.१ जानेवारी २०१२ पासून लागु करण्यास शासन मान्यता येत आहे.सदर परिरक्षण (परिपोषण) अनुदान खालील संस्थांना लागु राहिल :-

| अ.क्र. | संस्थेचा प्रकार |
|---|---|
| १ | विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या अनुदानित प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक आश्रमशाळा. |
| २ | ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी असलेल्या अनुदानित प्राथमिक आश्रमशाळा |
| ३ | अनुसूचित जातीच्या अनुदानित प्राथमिक/ माध्यमिक आश्रमशाळा |
| ४ | मागासवर्गीय मुलामुलींची अनुदानित वसतीगृहे |
| ५ | अपंगाच्या अनुदानित विशेष शाळा / कर्मशाळा |
| ६ | अस्थिव्यंग मुलांसाठी अनुदानित निवासी शाळा |
| ७ | बहिरे व मुके यांच्याकरिता असलेल्या अनुदानित निवासी शाळा |
| ८ | अंध मुलांसाठीच्या अनुदानित निवासी शाळा |
| ९ | अनुदानित वृध्दाश्रम |
| १० | आदिवासी विभागाअंतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळा |
| ११ | महिला व बाल विभागाअंतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित संस्था (एडसग्रस्त व मतीमंद वगळून) |

२. तसेच स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येत असलेल्या शासन मान्यताप्राप्त अनुदानित संस्थांतर्गत महिला व बाल विकास विभागामधील एडसग्रस्त व मतीमंद निवासी विद्यार्थ्यांसाठी रु. ८२५/- वरून आणि सामाजिक न्याय विभागामधील मतिमंद निवासी विद्यार्थ्यांसाठी रु. ६३०/- वरून दरमहा दरडोई रू.९९०/- इतके परिपोषण अनुदान दि.१ जानेवारी २०१२ पासून वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३ सदर परिपोषण अनुदानात वाढ केल्यामुळे देय होणारे अनुदान वितरित करण्यापूर्वी वरील सर्व संस्थांमध्ये निवासी विद्यार्थ्यांची संख्या योग्य आहे किंवा कसे,पटावर दर्शविण्यात आलेले निवासी विदयार्थी संस्थेत नेहमी उपस्थित असतात किंवा कसे याची पूर्ण तपासणी करून पटावरील निवासी विदयार्थी संख्या योग्य असल्याची खात्री करावी त्यानंतरच परिपोषण अनुदान वितरित करण्यात यावे.

४ या बाबीवरील खर्च त्या त्या संस्थांसाठी मंजूर/ असलेल्या त्या त्या विभागाच्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१११२२९०६२८५०१२५०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( कि.पो.वडते )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. प्रधान सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई
मा. प्रधान सचिव (वित्त),मंत्रालय, मुंबई
मा.प्रधान सचिव (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई
मा.प्रधान सचिव (महिला व बालविकास), मंत्रालय, मुंबई
आयुक्त,समाज कल्याण,महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, वि.जा.भ.ज.,इ.मा.व. व वि.मा.प्र.,महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
डॉ.संजय ओक, संचालक, वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रूग्णालये, के.ई.एम.रूग्णालय, परळ, मुंबई
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद
कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, ताडदेव, मुंबई
आहार तज्ञ, के.ई.एम.रूग्णालय, परळ, मुंबई

(31)

50

(25)



मा.राज्यमंत्री/मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव

मा.राज्यमंत्री/मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव

मा.राज्यमंत्री/मा.मंत्री, महिला व बालविकास यांचे खाजगी सचिव

महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर

सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण विभाग

सर्व सहायक आयुक्त,समाजकल्याण

सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,जिल्हा परिषद

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी शाखा,मुंबई

सह संचालक, लेखा व कोषागारे,मंत्रालय, मुंबई ३२

मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक

निवड नस्ती (विणाभज-२)

---